# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ,पुणे

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन)

## कोलाम जमातीतील कुमारी मातांच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाकरिता करण्यात आलेल्या संशोधनात्मक अभ्यास दौरा अहवाल

**पार्श्वभुमी** - यवतमाळ जिल्हयात सतत वर्तमान पत्रात चर्चेत असलेला विषय झरी – जामनी या तालुक्यातील कुमारी मातांच्या प्रश्नाबाबत होय. या करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत झरी – जामनी या तालुक्यातील कुमारी मातांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याबाबत प्राथमिक सर्वेक्षण करण्यासाठी दि. **१२ ते १६ एप्रिल २०१४ रोजी** अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.

या अभ्यास दौ-याचा उद्येश कुमारी मातांच्या सामाजिक व आर्थिक समस्या जाणुन घेणे तसेच कौशल्य विकास प्रशिक्षणातुन उदरनिर्वाहाकरिता एक साधन प्राप्त करुन देणे हा होय.

झरी जामणी तालुक्यातील **कोडपाखिंडी, मार्थाजुन, शिबला, झरी, जामणी** या गावांना भेटी देवून कोलाम जमातीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीबाबत माहिती संकलित करण्यात आली.

यवतमाळ जिल्हा




**झरी जामणी** हा महाराष्ट्र राज्यातील यवतमाळ जिल्ह्याचा एक तालुका आहे. या तालुक्याची निर्मिती 1997 साली करण्यात आली. तालुक्याचे मुख्यालय झरी या गावात आहे. येथून सुमारे 3 कि. मी. अंतरावर जामणी गाव आहे. या दोन गावांच्या संयुक्त नावाने या तालुक्याचे नाव झरी जामणी असे ठेवण्यात आले. महत्त्वाची सर्व कार्यालये, विद्यालये, महाविद्यालय झरी गावात आहेत. झरी जामणी तालुक्यात **एकूण 154 गावे असून** 34 पाडे आहेत.

**भौगोलिक स्थिती** — यवतमाळ जिल्हा हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा कापूस उत्पादक जिल्हा आहे. बालाघाट डोंगर रांगांपासून तयार झालेला हा जिल्हा डोंगराळ मध्यम पठाराचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात विपुल प्रमाणात वनसंपत्ती आहे.

झरी जामणी तालुक्यात कापूस, ज्वारी, गहू, सोयाबीन, तूर, मूग,इ. पिके घेतली जातात. तर मोह, तेंदू, डिंक हे महत्त्वाचे गौण वनोपज येथे आहेत.

**झरी जामणी तालुक्याची भौगोलिक माहिती**

| | | |
|---|---|---|
| १ | क्षेत्र | ७५१ चौ.कि.मी |
| २ | कृषी क्षेत्र | ५०२ चौ.कि.मी |
| ३ | वन क्षेत्र | १४९ चौ.कि.मी |
| ४ | एकुण गावे | १२८ ( स्थापित - १०६, उजाड - १२२) |
| ५ | एकुण लोकसंख्या | ७२१५५ ( पु -३६६०६, स्त्री - ३५५४९) |
| ६ | बालकांची संख्या | १०११० ( मुले — ५२२८, मुली -४८८२) |
| ७ | स्त्री पुरुष प्रमाण | ९७१ |
| ८ | साक्षरता | ४१०२६ ( पु — २६६०९, स्त्री - १६४१७) |
| ९ | सरासरी पर्जन्यमान | १०४०.५ मी.मी |
| १० | कुटुंबे | १३१६० |
| ११ | शेतकरी | १२२२७ |
| १२ | शेतमजुर | ३९६० |
| १३ | अनु.जाती शेतमजुर | ४३६४ |
| १४ | अनु. जमाती शेतमजुर | २६०४४ |

(वेब साइट- यवतमाळ जिल्हा )

**लोक जीवन** - तालुक्याचे ठिकाणही म्हणावे तसे विकसित नाही. सर्वत्र ग्रामीण आणि दुर्गम डोंगर - दऱ्यांचीच वस्ती आहे. ग्रामीण भागात प्रचंड अंधश्रध्दा आणि व्यसनाधीनता आहे. शिक्षणाबाबत उदासीनता आहे. पारंपरिक लोकपरंपरा आणि दैवतात मशगुल राहणारा हा समाज उदासीन आहे. अहोरात्र दारूच्या अन् जुगाराच्या अड्ड्यावर राहाणारे युवक आहेत.

कोलाम नावाची आदिवासी जमात प्रामुख्याने यवतमाळ जिल्ह्यातील **केळापूर, झरी जामणी, घाटंजी, वणी, राळेगाव, मारेगाव, कळंब** इत्यादी तालुक्यांमध्ये आणि यवतमाळ जिल्ह्याचे शेजारी असलेले **नांदेड (माहूर,किनवट), वर्धा** आणि **आदिलाबाद जिल्हा (आंध्र प्रदेश)** च्या काही तालुक्यांमध्ये वस्ती करून राहते. झरी-जामणी आणि केळापूर तालुक्याला लागूनच अदिलाबाद जिल्ह्याची अर्थात आंध्रची सीमा आहे.

जिल्ह्यात अनेक जाती-जमातीचे लोक राहतात. कुणबी, माळी, बंजारा, आंध, गोंड, परधान, आणि कोलाम या काही प्रमुख जमाती जिल्ह्यात वास्तव्यास आहेत. येथे मराठी बरोबरच बंजारी, कोलामी इत्यादी बोलीभाषा बोलल्या जातात.

झरी जामणी तालुक्यात **कोलाम, गोंड, परधान, आंध** या आदिवासी जमातीचे लोक बहुसंख्येने राहतात.

**सामाजिक स्थिती** – प्रामुख्याने डोंगराळ आणि जंगलाच्या भागात आणि मुख्य गावापासून काही अंतर राखून आपले वेगळे गाव म्हणजे **पोड** तयार करून राहतात. हा समाज भटका नाही, वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी राहणे यांनाही पसंत आहे. नवीन पोड वसविण्यापूर्वी कोलामातील निवडक मंडळी वस्तीसाठी योग्य जागा ठरवतात. अशा ठिकाणी मोराम देवाची पूजा सगळयात आधी करण्यात येते. मोराम देवाचा कौल मिळताच नवीन पोड उदयास येते. अशा नवीन पोडावर पहिल्या तीन वर्षात अन्य कोणत्याही देवाची पूजा होत नाही. तसेच **पोडावर इतर कोणत्याही जमातीतील लोकांना प्रवेश देत नाहीत.**

एकदा तीन वर्षे एका ठिकाणी काढल्यावर त्यांच्या इतर देवतांच्या आराधना आणि सणोत्सव ते साजरे करू लागतात. बहुतेक सणांचा संबंध हा निसर्गाशी जोडला असल्याचे दिसून येते. कोलामांची सगळयात महत्त्वाची देवता म्हणजे माहूरची श्री रेणुका देवी (चित्र). सगळ्या कोलाम पोडांवर रेणुका देवीची प्रतिकृती समजली जाणारी *देवी* या देवतेची स्थापना करण्यात येते. त्याशिवाय इतर अनेक देव आणि देवी यांची स्थापना देखील करण्यात येते.[१]

या अभ्यास दौ-यात मिळालेल्या माहिती नुसार कोलाम समाज आजही शैक्षणिक दृष्टया मागासलेला असल्यामुळे अंधश्रध्देच्या प्रथेत अडकुन पडलेला दिसून येतो. कोलाम जमातीमध्ये विवाहाशिवाय शरीरसंबंध ठेवण्यास समाज मान्यता आहे. हा त्यांच्या सामाजिक प्रथेचा भाग आहे असे ते मानतात. या शरीर संबंधातून अपत्याला जन्म दिला जातो. स्त्रीची इच्छा असेल तर तिचा विवाह केला जातो. अन्यथा आयुष्यभर ती स्त्री कुमारी राहून आपल्या मुलांचे पालन – पोषण करते. कुमारी मातेने जर लग्न केले नसेल तर ती मुलगी तिच्या वडिलांचे नाव तिच्या मुलाला लावले जाते म्हणजे मुलाला आजोबांचे नाव मिळते. या सामाजिक प्रश्नामुळे होणा-या अपत्यांना शैक्षणिक व इतर शासकिय दाखले मिळण्यास अडचणींना सामोरे जावे लागते.

या अभ्यास दौ-यात **श्री. नरोटे, गृहपाल** यांचेशी चर्चा केली असता त्यांनी **श्रीमती अर्चना हिंगोले महिला बालविकास अधिकारी, यवतमाळ** यांचेशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधून झरी जामणी येथिल कुमारी माताबाबत विचारणा केली. त्यांच्याकडुन मिळालेल्या माहिती नुसार त्या भागातील कोलामांच्या मुलींचा सर्वेक्षण करण्यात आला असुन त्या बाबतची माहिती शासनास यादी सादर करण्यात आली आहे. परंतु सदर यादी गोपनीय असल्याने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे परवानगी शिवाय अहवाल देता येणार नाही असे त्यांनी सांगितले.

या नंतर **श्री. बिटाळकर, विस्तार अधिकारी, झरी** जामणी यांची भेट घेवून याबाबत विचारणा केली असता त्यांनी दिलेल्या माहितीनुसार झरी जामणीतील एकूण १५ गावामधुन अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून सर्वेक्षणाव्दारे कुमारी मातांची यादी तयार करुन अहवाल शासनास सादर करण्यात आले आहे. तसेच या भागातील कुमारी मातांबाबत तहसीलदार, पोलिस विभागाची वेगळी यादी आहे असेही समजले.

झरी येथिल काही महिलांशी चर्चा केली असता असे समजले कि, आंध्र प्रदेशाची सीमा जवळ असल्याने या प्रदेशातील लोक शेती करण्यासाठी झरी जामणीतील अदिवासी लोकांच्या शेतजमिनी भाड्याने कसण्यासाठी घेतात. येथे मिरचीचे उत्पादन घेतले जाते. किफायतशीर शेतजमिन व स्वस्त मजुर पुरवठा यामुळे ठेकेदार या भागात शेती करण्यास आकर्षित होतात. वर्षातील ८ महिने या भागातील लोकांना शेतमजुरीचे काम मिळते. साधारणत: शेतजमिनीचे वार्षिक भाडे १ ते २ लाख एवढे असते. शेतमजुरीचा दर प्रति दिन १०० – १५० रु. दिला जातो. ठेकेदारांच्या शेतात या परिसरातील आदिवासी मुली व महिला वर्ग रोजंदारीवर शेत मजूरी करतात. तर अश्या ठेकेदारां कडुन लैंगिक शोषण होवू शकते, परंतु कोलाम जमातीतील लोक आपल्या पोडावर इतर कोणत्याच समाजातील लोकांना येवू देत नाहीत. यावरुन असे लक्षात येते की, या जमातीत विवाहाला इतर समाजासारखे विशेष महत्व दिले जात नाही. म्हणुन कुमारी मातांचा प्रश्न उदभवला आहे.

**आर्थिक स्थिती** – यवतमाळ जिल्ह्यातील **४०४ गावं आंध्रप्रदेशच्या सीमेवर** आहेत. **झरी ते आंधप्रदेशातील** अंतर फक्त **७** कि.मी आहे. शेती हा येथिल लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. पांढरकवडा, झरी – जामणी या प्रवासामध्ये झरी, जामणी, माथार्जुन, शिबला, कोडपाखिंडी या गावांची पाहणी केली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अदिवासी लोकांची शेतजमीन असल्याचे समजले. शासनातर्फे कोलाम जमातीतील लोकांना शेतजमीन देण्यात आलेल्या आहेत. परंतू शेती करण्याकरिता भांडवल नसल्याने बहुतांश लोक स्वत:ची शेती करु शकत नाही. याचाच परिणाम उदरनिर्वाहासाठी हे लोक शेतमजूरी करतात. तसेच इतर कोणतेही लघु उदयोग या परिसरात नाहीत.

मुख्यत्वेकरून हया परिसरात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणत असल्याचे निदर्शनास आले. शेतीला पूरक म्हणून पशुपालन व्यवसायही केला जातो. डोंगरातील या आदिवासी तालुक्यात कापूस, सोयाबीन, ज्वारी, मिरची, तूर, गहू ही पिके घेतात. ज्यांच्याजवळ जमीन आहे आणि पाणी आहे असे शेतकरी जगतात. पाण्याची सोय नसलेले शेतकरी आर्थिक विपन्नावस्थेमुळे आत्महत्येकडे वळतात. तसेच ठेकेदार अदिवासी लोकांच्या शेतामध्ये स्थानिक लोकांना मजुरीची कामे देवून संपुर्ण पीक आंध्र प्रदेशात घेवून जातात. तेव्हा या परिसरातील शेत जमिनीची चौकशी होणे आवश्यक आहे असे वाटते.

**आरोग्य स्थिती** – कोलाम महिलांच्या आरोग्या बाबत **डॉ. अभिजीत चाहथड आरोग्य अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, झरी व श्री. मडावी, आरोग्य अधिकारी, झरी** यांच्याशी संपर्क साधला असता पुढील माहिती मिळाली.

झरी येथे सरकारी ग्रामीण रुग्णालय आहे. परंतु सरकारी रुग्णालयात अनैसर्गिक गर्भपात केले जात नाही. झरी येथे खासगी रुग्णालय उपलब्ध नसल्याने तसेच गर्भपात करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने येथिल बळी पडलेल्या कुमारी मातांकडे मुलांना जन्म देण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो. यामुळेच

यांची गणती कुमारी मातांमध्ये केली जाते. यातूनच स्त्रियांच्या आणि बालकांच्या आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला. मुलींच्या शिक्षणाच्या मागासलेपणाचे बीज यात दडलेले आहे.

**१. कुपोषण** : या भागात कुपोषण अदयाप ही थोड्या फार प्रमाणात दिसून येते. गरोदरपणात मातेला आवश्यक तो आहार मिळत नाही. डॉक्टरांनी दिलेली औषधे व सूचना यांचे पालन केले जात नाही. याचाच परिणाम शासनाच्या कुपोषण कमी करण्याच्या विविध योजना असुनदेखील या भागात कुपोषणचे प्रमाण दिसून येते.

**२. एच.आय.व्ही:**

लैंगिक शिक्षणाचे अज्ञान व एडस बाबतची अपुरी माहिती या लोकांमध्ये एच.आय.व्ही चे रुग्ण आहेत. माथार्जुन येथे एच. आय. व्ही चे प्रमाण जास्त आहे.

**३. साथीचे रोग :**

लहान मुलांमध्ये गॅस्ट्रो, न्युमोनीया, कांजण्या या साथीच्या रोगांचे प्रमाण जास्त आहे.

**४. रक्त कमतरता :**

सर्व अदिवासी स्त्रियांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी आहे. कोलाम स्त्रियांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण १० पेक्षा कमी असते. आहाराबाबतची उदासीनता दिसून येते.

**५. गर्भ धारणेचे कमी वय :**

कोलाम समाजात लग्नाशिवाय शरीरसंबंध ठेवण्यास परवानगी असल्याने १४-१५ वर्षाच्या मुलीसुध्दा माता आहेत. कमी वयात गर्भधारणा झाल्यामुळे होणारे मुल हे कुपोषणस व इतरही आजारास बळी पडतात. तसेच माता बालक मृत्युचे प्रमाण जासृत दिसुन येते. कमी वयातील गर्‌भधारणेमुळे शाररिक अडचणी निर्माण होतात.

**६. लैंगिक शिक्षणाचा अभाव** — कोलामांच्या मुले- मुलीमध्ये लैंगिक शिक्षणाचा अभाव व प्रतिबंधात्मक उपाय योजना याबाबत अज्ञान आहे. मुली कोणत्याही आमिषाला बळी पडतात व त्यांचा गैर फायदा घेतला जातो.

कोलामांच्या सामाजिक प्रथेमुळे कोलाम जमातीत कुमारी मातांचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी कुटुंबातील किशोरवयीन मुली आर्थिक मागासलेपणा, लैंगिक शिक्षणाचा आभाव, निरक्षरता, भावनाविवशता यामुळे लैंगिक शोषणाला बळी पडल्याचे समजले.

**७. व्यसनाधीनता** - कोलामांच्या प्रदेशात मोहाचे वैपुल्य असल्यामुळे मोहाची दारू ते पितात. गांजा, भांग, अफू वगैरे व्यसने आहेत. या भागातील युवक हे मोठया प्रमाणत व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेले दिसुन आले. तसेच मटका, सटटयाचे प्रमाणही आहे.

**शासकिय उपाययोजना** — या परिसरात राबविण्यात येणा-या आदिवासींच्या शासकिय योजनांचा लाभ मिळवण्याबाबत लोकांची उदासीनता दिसून येते. असे येथिल आरोग्य अधिका-यांच्या चर्चेतुन स्पष्ट झाले. त्यामुळे शासकिय योजना असूनही हा परिसर मागासलेला दिसून येतो.

**आधारगृह** : झरीतील आरोग्य अधिका-याच्या माहिती नुसार या भागातील कुमारी मातांसाठी आधारगृह सुरु करण्याचा शासन प्रस्ताव आहे. मारेगावात ५ एकर जागेत हा प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

नाशिक जिल्हयात आदिवासी महिलांसाठी आधारगृहाचा प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे. या आधारगृहात कुमारी मातांना पुढील सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

- त्यांना त्यांच्या आवडीनुसार व कुवतीनुसार कौशल्य प्रशिक्षण देणे. उदा: शिवणकाम, विणकाम, विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू बनविणे, इ. यातून त्यांच्यासाठी रोजगार निर्माण करुन त्यांना स्वावलंबी करण्यात येईल.
- आधारगृहात दाखल झालेली स्त्री गरोदर असेल तर तिचे व्यवस्थितरीत्या बाळंतपण करणे. जर तिला मुल नको असेल तर अशा मुलांना दत्तक देण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे. तसेच मुलांना आवश्यक त्या सर्व सेवा-सुविधा पुरविल्या जातील.
- कुमारी मातांच्या इच्छेनुसार या आधार गृहात राहण्याची व्यवस्था आहे. त्यानां जर परत आपल्या कुटुंबात जावयाचे असल्यास तर परत कुटुंबात पाठविण्याची सोय केली जाते.

याच दरम्यान शिबला येथे एका पत्रकाराशी भेट झाले असता त्यांनी असे सांगितले की, एका सामाजिक संस्थेने कुमारी मातांबाबत सर्वेक्षण करून शासनाकडून अनुदान मिळवले. परंतु प्रत्यक्षात कुमारी मातांना कोणताच लाभ दिला नाही. त्यामुळे कुमारी मातांच्या चौकशी करिता कोणी आले तर कोलाम जमातीतील लोक कोणताच प्रतिसाद देत नाहीत. तसेच ते याबाबतीत आक्रमक बनतात व पोडावर कोणलाही येवु देत नाहीत. शासकिय अधिकारी असेल तरी सुध्दा ते पोडावर येवु देत नाहीत.

उपरोक्त मिळालेल्या माहिती व पाहणी नुसार झरी-जामणी तालुक्यात कोलामांमध्ये असणा-या अशिक्षितपणा, अंधश्रध्दा, व्यसनाधीनता व कमजोर आर्थिक परिस्थिती या सर्व कारणांमुळे कोलाम जमातीतील मुली लैंगिक अत्याचारास बळी पडतात व यातुनच कुमारीमातांचा प्रश्न समोर येत आहे.

**उपाययोजना** – भेटीदरम्यान निर्दशनास आलेल्या गोष्टी व प्राप्त माहितीनुसार बार्टीकडुन खालील उपाययोजना करता येतील.

१. कोलामांच्या असणारी अंधश्रध्दा, व्यसनाधीनता, लैंगिक शिक्षण व आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करणे.
२. कोलाम जमातीतील युवक-युवतींनां निश्चित व गरजेचे व्यवसाय प्रशिक्षण देणे.
३. कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देवुन आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवणे.
४. कोलाम महिलांमध्ये बचतीच्या माध्यामतुन लघु उदयोगाबाबत मार्गदर्शन करणे.

# झरी जामणी तालुका

## कुमारी मातांची यादी

| अ क्र. | गावांची नावे | जमात | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मार्थाजुन | कोलाम | ५ |
| | | परधान | १ |
| | | गोंड | १ |
| २ | गारगोटी | कोलाम | १ |
| ३ | मांडवा | गोंड | १ |
| | | कोलाम | १ |
| ४ | रांजणी | कोलाम | १ |
| ५ | चिखडोह | गोंड | १ |
| ६ | मांगली | भोई | १ |
| ७ | उमरी पोड | कोलाम | २ |
| ८ | जुनोनी | कोलाम | १ |
| ९ | झमकोला | कोलाम | १ |
| १० | अडकोली | गोंड | १ |
| ११ | वल्हासा | कोलाम | १ |
| १२ | वढोणावंदी | कोलाम | २ |
| १३ | निमणी | कोलाम | ६ |
| १४ | पाचपोर | कोलाम | ४ |
| १५ | गणेशपुर | गोंड | १ |
| १६ | मजरा | कोलाम | १ |
| १७ | कलटलीबोरगाव | गोंड | १ |
| १८ | सिबला | कोलाम | १ |
| १९ | पार्डी | कोलाम | १ |
| २० | मुकुटबन | गोंड | १ |
| २१ | मारेगाव प्रकल्प | -- | -- |
| २२ | हटवांजरी | कोलाम | १ |
| २३ | जळकापोड | कोलाम | १ |
| २४ | पेडरी | कोलाम | १ |
| २५ | सोनूपोड | कोलाम | १ |
| | | **एकुण** | ४२ |

- **कोलाम — ३३**
- **गोंड — ७**
- **परधान — १**
- **भोई - १**